तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,
३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१, फॅक्स - २२६९२१०२.
E-mail : desk10@dtemaharasthra.gov.in Internet : www.dtemaharasthra.gov.in


**परिपत्रक/महत्वाचे**

**क्रमांक:** 10/एडीएम/पदविका/2018/ १०८१
**दिनांक:** 30 AUG 2018

**विषय:-** शैक्षणिक वर्ष 2018-19 मधील प्रथम वर्ष पोस्ट एसएससी पदविका अभियांत्रिकी / प्रथम वर्ष पोस्ट एचएससी पदविका फार्मसी, सरफेस कोटिंग टेक्नॉलॉजी, एचएमसीटी व थेट व्दितीय वर्ष पोस्ट एसएससी पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रमात प्रवेशित उमेदवारांचे विहित मुदतीतील नॉन क्रिमी लेअर प्रमाणपत्र असलेल्या विद्यार्थ्याच्या प्रवेशाबाबत...

संदर्भ:- 1. या संचालनालयाचे पत्र क्रमांक 2अ/एडीएम/2018/848 दि. 02.07.2018
2. या संचालनालयाचे परिपत्रक क्रमांक 10/एडीएम/पदविका/201/1043 दि. 24.08.2018.
3. या संचालनालयाचे परिपत्रक क्रमांक 10/एडीएम/पदविका/201/1044 दि. 24.08.2018.

उपरोक्त विषयास अनुसरुन नमुद करण्यात येते की, संदर्भिय पत्र क्रमांक 1 अन्वये शैक्षणिक वर्ष 2018-19 करिता प्रथम वर्ष पोस्ट एसएससी पदविका अभियांत्रिकी / प्रथम वर्ष पोस्ट एचएससी पदविका फार्मसी, सरफेस कोटिंग टेक्नॉलॉजी, एचएमसीटी व थेट व्दितीय वर्ष पोस्ट एसएससी पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रमाकरिता खालील तक्त्यात नमुद केल्याप्रमाणे प्रवेशित विद्यार्थ्यांनी नॉन क्रिमी लेअर प्रमाणपत्र सादर करणेबाबत अंतिम तारीख निश्चित करण्यात आलेली आहे.

| अ.क्र. | अभ्यासक्रम | नॉन क्रिमी लेअर प्रमाणपत्र सादर करण्याची अंतिम तारीख |
|---|---|---|
| 1 | थेट व्दितीय वर्ष पोस्ट एसएससी पदविका अभियांत्रिकी | 23.08.2018 |
| 2 | प्रथम वर्ष पोस्ट एसएससी पदविका अभियांत्रिकी | 25.08.2018 |
| 3 | प्रथम वर्ष पोस्ट एचएससी पदविका फार्मसी, सरफेस कोटिंग टेक्नॉलॉजी, एच.एम.सी.टी. | 26.08.2018 |

त्याअनुषंगाने कळविण्यात येते की –

1. ज्या विद्यार्थ्यांनी वर नमुद अंतिम दिनांकापर्यंत संबंधित प्राधिकरणाने निर्गमित केलेले नॉन क्रिमी लेअर प्रमाणपत्र प्राप्त केले असुन काही तांत्रिक कारणास्तव संस्थेमार्फत या संचालनालयाच्या संकेतस्थळावर अपलोड केले नाहीत, अशा प्रवेशित विद्यार्थ्यांचे प्रवेश रद्द करण्यात येऊ नयेत.
2. ज्या विद्यार्थ्यांनी संबंधित मागासवर्गीय प्रवर्गातुन अर्ज सादर केला होता व त्यांना गुणवत्तेने General Open/ TFWS/Defence/Minority seat/ PWD seat या जागेवर प्रवेश मिळाला परंतु, वर नमुद अंतिम दिनांकापर्यंत संबंधित प्राधिकरणाने निर्गमित केलेले नॉन क्रिमी लेअर प्रमाणपत्र विद्यार्थ्यांने सादर केले नाही, अशा विद्यार्थ्यांचे प्रवेश संबंधित संस्थेने कॅटेगरी कन्व्हेशन फी रक्कम रु. 100/- (रक्कम रु. शंभर फक्त) आकारुन खुल्या प्रवर्गामध्ये बदल करण्यात यावा व तसे संबंधित विद्यार्थ्यांस लेखी निदर्शनास आणावे.

3. तसेच वर नमुद अंतिम दिनांकानंतरचे संबंधित प्राधिकरणाने निर्गमित केलेले नॉन क्रिमी लेअर प्रमाणपत्र विद्यार्थ्यांनी प्रवेशासाठी सादर केले असल्यास, अशा विद्यार्थ्यांचे प्रवेशाबाबत संदर्भिय परिपत्रक क्रमांक 2 व 3 मध्ये नमुद केल्याप्रमाणे संस्थेने तात्काळ कार्यवाही करावी.

तसेच वर नमुद प्रवेशाबाबत संस्थेने विहित कालावधीत कार्यवाही केली नाही तर होणाऱ्या पुढील परिणामास संबंधित संस्था सर्वस्वी जबाबदार राहील, यांची नोंद घेण्यात यावी.

(डॉ. अभय वाघ)
संचालक,
तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा.,मुंबई

प्रत:- **माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी**

1. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती,औरंगाबाद, मुंबई, नागपुर, नाशिक, पुणे यांना कळविण्यात येते की, वरील परिपत्रक आपल्या विभागाच्या अधिनस्त सर्व पदविका अभ्यासक्रमांच्या संस्थांना त्यांच्या सूचनाफलकावर दर्शनी भागात दिसेल अशा ठिकाणी प्रदर्शित करण्याबाबत कळविण्यात यावे.
2. कार्यासन क्रमांक 3,(माहिती तंत्रज्ञान शाखा), मुख्य कार्यालय, मुंबई यांना कळविण्यात येते की, सदर परिपत्रक संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावे तसेच उचित कार्यवाहीसाठी रवाना.

E:\letters\cap 2010-11\notification regarding cap 2017-18.doc